# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय, नांदेड.

पत्ता : गांधी पुतळयाजवळ, स्टेशन रोड नांदेड. फोन- ०२४६२-२३७१०१. Email :nandedrdc@gmail.com

जा.क्र.२०२०/आरबी-१/डेस्क२/टे-४/crpc-१४४/प्र.क्र.-१३ दिनांक.१३.०४.२०२०

वाचाः- १) या कार्यालयाचे समक्रमांकीत फौजदारी प्रक्रीया संहिता १९७३ चे कलम १४४ प्रमाणे मनाई आदेश दिनांक २२.०३.२०२०, दि.२३.०३.२०२०, दि.२४.०३.२०२० व दि.२५.०३.२०२०.

२) महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना क्र.DMU/२०२०/CR-९२/DISM-१, दिनांक २३.०३.२०२०.

३) साथरोग प्रतिबंध कायदा १८९७.

४) आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५.

५) सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना क्र. करोना २०२०/ प्रक्र.५८/आरोग्य -५ दि.१४ मार्च,२०२०.

६) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, यांचेकडील अधिसूचना, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई क्र.DMU/२०२०/CR-९२/DISM-१,दिनांक २४.०३.२०२०, दिनांक २५.०३.२०२० व दिनांक १३ एप्रिल, २०२०.

**विषयः** कोरोना विषाणूंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपायोजना करणेबाबत.
(नांदेड जिल्हयात फौजदारी प्रक्रिया दंड संहीतेचे कलम १४४ ची मुदत **दि.३० एप्रिल, २०२० पर्यंत** वाढविणेबाबत.)

## आदेश

ज्याअर्थी शासनाने कोविड-१९ चा प्रादुर्भाव रोखण्याच्या अनुषंगाने उपायोजनेचा एक भाग म्हणुन मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, यांचेकडील संदर्भ क्र.०६ मध्ये नमूद अधिसूचना दिनांक १३ एप्रिल, २०२० अन्वये या पुर्वी दिलेले सर्व प्रकारचे आदेश /परिपत्रक/निर्देश दिनांक ३० एप्रिल, २०२० पर्यंत लागु राहतील असे अधिसूचित केले आहे.

आणि ज्याअर्थी या कार्यालयाचे संदर्भ क्र.१ वर नमुद आदेशान्वये दिनांक.१४ एप्रिल, २०२० रोजी चे २४.०० वा. पर्यंत संपुर्ण नांदेड जिल्हयात जमावबंदी आदेश लागू करण्यात आले होते. तथापि शासनाकडून संदर्भ क्र. ०६ वरील आधिसुचनेव्दारे प्राप्त निर्देशानुसार व फौजदारी प्रक्रीया दंड संहिता १९७३ चे कलम १४४ खालील तरतुदीच्या अनुषंगाने नांदेड जिल्हयातील नागरी, ग्रामीण तसेच औद्योगिक क्षेत्रातील जनतेस, खालील व्यक्ती, आस्थापना यांना उद्देशुन दिनांक ३० एप्रिल, २०२० पर्यंत नांदेड जिल्हयात जमावबंदी आदेश काढणे आवश्यक असल्याचे माझी खात्री झाली आहे.

Scanned with CamScanner

# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय, नांदेड.

पत्ता : गांधी पुतळयाजवळ,स्टेशन रोड नांदेड. फोन- ०२४६२-२३७१०१, Email :nandedrdc@gmail.com

त्याअर्थी, मी डॉ. विपीन इटनकर, भा.प्र.से. जिल्हादंडाधिकारी नांदेड, फौजदारी प्रक्रीया दंड संहिता १९७३ चे कलम १४४ (१)(३) अन्वये जिल्हयात मनाई आदेश **दिनांक १४ एप्रिल, २०२० रोजी रात्री २४.०० वा. पासुन ते दिनांक ३० एप्रिल, २०२० रोजी मध्यरात्री २४.०० वा.** पर्यंत नांदेड जिल्हयात संपुर्ण नागरी, ग्रामीण व औद्योगिक क्षेत्रात या कार्यालयाने यापुर्वी काढलेले प्रतिबंधात्मक आदेश व अत्यावश्यक सेवा, शेती विषयक तसेच, वेळोवेळी दिलेल्या इतर बाबीसाठीची सुट जशास तशी अंमलात राहील.

सदर आदेशाची अंमलबजावणी करणाऱ्या सर्व अधिकारी यानी वरील नियमांची अमलबजावणी काटेकोरपणे, नियमाला धरून व मानवी दृष्टीकोणातुन करावी. त्याच प्रमाणे सदरील आदेशाचे पालन न करणा-या कोणतीही व्यक्ती,संस्था अथवा समुह हे साथरोग प्रतिबंधक कायदा १८९७ व आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ आणि भारतीय दंड संहिता १८८ नुसार शिक्षेस पात्र असलेला अपराध केला असे मानण्यात येईल व कारवाई करण्यात येईल.

वरील आदेशाची अंमलबजावणी करीत असतांना सद्हेतुने केलेल्या कृत्यासाठी कुठल्याही अधिकारी व कर्मचारी यांचेवर विरुध्द कुठल्याही प्रकारची कायदेशिर कारवाई अथवा खटला दाखल करता येणार नाही.

हे आदेश दि.१३.०४.२०२० रोजी माझे सही शिक्यानिशी निर्गमित करण्यात आली आहे.

स्वा/-
**(डॉ.विपीन इटनकर)**भा.प्र.से.
**जिल्हादंडाधिकारी नांदेड.**

**प्रतिलिपी- माहीतीस्तव सादर**

१. मा.मुख्य सचिव,महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई
२. मा.अपर मुख्य सचिव, गृह विभाग (विशेष) मंत्रालय, मुंबई-३२.
३. मा.विभागीय आयुक्त औरंगाबाद.

**प्रतिलीपी – आवश्यक कार्यवाहीस्तव**

१. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड
२. आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
३. पोलीस अधिक्षक, नांदेड
४. अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, नांदेड
५. सर्व उपविभागीय दंडाधिकारी नांदेड जिल्हा
६. सर्व पोलीस उपविभागीय अधिकारी, नांदेड जिल्हा
७. सर्व तालुका दंडाधिकारी नांदेड जिल्हा
८. जिल्हा माहीती अधिकारी नांदेड
९. केंद्र संचालक आकाशवाणीकेंद्र नांदेड यांना प्रसिद्धीस्तव.

COLLECTOR & DISTRICT MAGISTRATE NANDED Dist.

जिल्हादंडाधिकारी नांदेड.

Scanned with CamScanner